# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 05/11/2023 (रविवार) सायंकाळ

---

### चोरी

पो.स्टे. काटोल :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील बैठक बार काटोल येथे दिनांक ०४/११/२०२३ चे १३.०० वा. १३.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— उत्तम चंपतराव धागरे, वय ४० वर्ष, रा. लक्ष्मी नगर काटोल यांची हिरो कंपनीची डेस्टनी मोपेड गाडी क्र. एम. एच.—४०/बी. एक्स—०८३० चे डिक्की मध्ये ठेवलेले नगदी १,५०,०००/—रू कोणीतरी अज्ञात ईसमाने गाडीचे डिक्कीचे झाकण खोलुन चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार लक्ष्मण रूढे मो. नं. ९९२३३५२६४ हे करीत आहे.

### बॅटरी चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत १५ किमी अंतरावर वार्ड क्र. ०३ गोंडखैरी येथे दिनांक ०४/११/२०२३ चे ००.३० वा. ते ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— गजानन धनवंती ठाकरे, वय ३७ वर्ष, रा. वार्ड क्र. ३ गोंडखैरी यांचे १) टाटा एस गाडी क्र. एम. एच— ४९/बी.जी— ८७०७ व २) महींद्रा गाडी क्र. एम. एच.— ४०/बी.एल— १०९६ या दोन्ही गाडया घराचे बाहेर लावल्या होत्या. घटना तारीख वेळी व ठिकाणी यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे दोन्ही गाडीच्या बॅटऱ्या किंमती अंदाजे १०,०००/— रू च्या चोरून नेल्या आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अतुल शेंडे, मो. नं. ८२०८१०१७८५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**